सर्च

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# नाविन्यपूर्ण पदव्युत्तर डिप्लोमा : स्पार्क

## ग्रामीण समाजात व्यसनांविरूद्ध सामाजिक कार्यक्रम

## SPARC

### समाजात काम करा, कमवा, शिका आणि पदविका मिळवा

### हा कोर्स कोणासाठी ?

- तुम्हाला सामाजिक काम करायचे आहे, पण कौशल्य नाही
- तुमच्याजवळ समाज कार्याची पदवी आहे पण अनुभव नाही
- तुम्हाला सामजिक कामाचा अनुभव आहे पण पदवी नाही
- तुम्हाला व्यसनाच्या प्रश्नावर काम करायचे आहे पण कसे करावे माहित नाही

**अशा सर्वांसाठी नवा उपाय - स्पार्क**

### सर्च , गडचिरोली आणि गोंडवाना विद्यापीठ

**आंतर - विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखे अंतर्गत**

## सर्च व गोंडवाना विद्यापीठ द्वारा नवी पदविका : स्पार्क
## (ग्रामीण समाजात व्यसनांविरूद्ध सामाजिक कार्यक्रम)

### १. पार्श्वभूमी

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) मधे समाजातील गरजांनुसार अनुरूप शिक्षण व कौशल्य विकास यावर भर आहे. गोंडवाना विद्यापीठा कडून गडचिरोली – चंद्रपूर जिल्हांसाठी अनुरूप असे नवीन शिक्षण व अभ्यासक्रम सुरू करण्याची अपेक्षा आहे. येथील समाजाच्या गरजांमधे एक ज्वलंत गरज तसेच शैक्षणिक संधी आहे.

1. आज समाजामध्ये दारू व तंबाखू चे व्यसन मोठ्या प्रमाणात पसरले आहे. जागतिक पातळीवर रोग आणि मृत्युला कारणीभूत ठरणाऱ्या 10 प्रमुख कारणांमधे दारू व तंबाखूहे आहेत. भारत सरकार व महाराष्ट्र शासन हे विविध कायदे व कार्यक्रमांद्वारे या दोन व्यसनांचे नियंत्रण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात सुगंधित तंबाखूबंदी कायदा तसेच मुंबई राज्य दारूबंदी कायदा लागू आहे. गडचिरोली व वर्धा जिल्ह्यात दारूबंदी आहे व चंद्रपूर जिल्ह्यात जून 2021 पर्यन्त दारूबंदी होती. पण यांची प्रभावी अंमलबजावणी हे एक सामाजिक आव्हान आहे. 2015-16 मध्ये सर्च व गोंडवाना विद्यापीठाने गडचिरोली व चंद्रपुर जिल्ह्यात सर्वेक्षण केले त्या नुसार 41 टक्के पुरुष दारू पितात, 44 टक्के लोक तंबाखूयुक्त पदार्थ सेवन करतात व त्यावर दरवर्षी 393 कोटी रुपये दारू व तंबाखू वर खर्च होतात ही गंभीर समस्या समोर आली.
2. गडचिरोली जिल्हा दारू व तंबाखू मुक्त व्हावा या प्रमूख हेतूने 'मुक्तिपथ' हे अभियान गडचिरोली जिल्हयात सर्च संस्था व महाराष्ट्र शासन यांच्या द्वारे 2016 मध्ये सुरु करण्यात आले. गडचिरोली जिल्हयातील सर्व १२ तालुक्यात विविध शासकीय विभाग, शिक्षण संस्था, गाव पातळीवरील संघटना व पदाधिकारी तसेच स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम गडचिरोली जिल्हात सुरू आहे. गेली पाच वर्षे 2016-21 मुक्तिपथचे जिल्हयाभरात 1500 गावात मुक्तिपथचे कार्य सुरू आहे. देशामधे अशा पध्दतीने होणारे जिल्हाव्यापी संयुक्त अभियान हे पहिले असून निश्चितच संपूर्ण देशासाठी पथदर्शी ठरणारे आहे.
3. या पद्धतीच्या कामाची गरज फक्त गडचिरोली चंद्रपूर जिल्हयापुरती  मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रासाठी किंबहुना भारतासाठी आवश्यक आहे.

### २. समस्या व गरज

१. पूर्ण भारतात, व विशेषत: गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात दारू व तंबाखूची समस्या मोठी आहे.

२. या समस्येवर समग्र पद्धतीच्या कामासाठी प्रेरणा, क्षमता व कौशल्य असलेले मनुष्यबळ उपलब्ध नाही

३. चंद्रपूर–गडचिरोली जिल्हयातील गरजानुंसार अभ्यासक्रम सुरू करण्याचे गोंडवाना विद्यापिठाचे मिशन आहे.

४. समाजकार्याचे शिक्षण घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या BSW, MSW सारख्या अभ्यासक्रमामध्ये ग्रामीण व आदिवासी समाजात दारू – तंबाखूचे नियंत्रण यासाठी समग्र पद्धतीने काम करण्याच्या विशिष्ट

अभ्यासक्रमाचा अभाव जाणवतो. समाजकार्याचे प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी आज अपुऱ्या कौशल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष काम करण्याच्या कमी संधी उपलब्ध होतात.

**३. उपाय**

यावर उपाय म्हणून समाजकार्य किंवा इतर शाखेत पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी **P. G. Diploma in Social Program on Addiction in Rural Community (SPARC)** हा स्थानिक गरजेनुसार शिक्षण या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 व गांधीजींच्या **नयी तालिम** या संकल्पनेच्या आधारावर निर्मित नवीन व वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

दुर्दैवाने आपल्या शिक्षणपद्धतीत जे शिकण्याची गरज नाही असे खूप काही अभ्यासक्रमामध्ये असते. या पेक्षा वेगळे, पर्यायी शिक्षण संभव आहे . त्यामुळे प्रत्यक्ष काम करता करता शिकणे हे **SPARC** या पदविकेचे स्वरूप राहणार. या प्रकारच्या शिक्षणासाठी विनोबा व गांधींनी मांडलेल्या 'नयी तालिम' चे आधार शैक्षणिक पद्धतीचे आधार राहतील.

1) पहिला आधार – शिक्षण कोणाचे? तर हे शिक्षण 'स्व' चे आहे.स्वत:ला ओळखणे म्हणजे शिक्षण. हे शिक्षण घेतांना व प्रत्यक्ष काम करतांना विध्यार्थ्याला स्वत:ची ओळख व क्षमतांचे भान होईल.
2) नयी तालिमचा दूसरा आधार 'स्वधर्म'- म्हणजे समाजामध्ये माझे इतरांच्या प्रती असलेले कर्तव्य. समाजामध्ये व्यसनांबाबत प्रत्यक्ष काम करता करता ज्ञान व क्षमता विकास व्हावा.
3) तिसरा आधार स्वधर्म करायचा कुठे? समाजात. त्यामुळे SPARC पदविकेसाठी विद्यार्थ्याला सरळ तालुक्याच्या ठिकाणी राहून 100 गावात काम करणे असे प्रस्तावित आहे. यासाठी गडचिरोलीत जिल्हाव्यापी सुरू असलेले सर्च चा मुक्तिपथ प्रकल्प हे शिक्षणाचे कर्मक्षेत्र म्हणून उपलब्ध राहील.
4) नयी तालिम चौथा आधार या पद्धतीने शिक्षणासोबत आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन झाले पाहिजे .विद्यार्थ्यांला काम करा – कमवा – शिका अशी तिहेरी संधी मिळेल. सोबतच, पुढे कामासाठी कर्म योग्यता प्राप्त होईल.

**४. उद्देश:**

1) "ग्रामीण समाजात व्यसनांविरूद्ध सामाजिक कार्यक्रम (SPARC)" नावाचा एक वर्षाचा सामाजिक कार्यातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करणे
2) या अभ्यासक्रमात residency अंतर्गत प्रत्यक्ष काम करून शिकण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.
3) महाराष्ट्रातील दारू आणि तंबाखूची समस्या कमी करण्यासाठी विशेष कौशल्य असलेल्या मनुष्यबळाची निर्मिती करणे.
4) यशस्वी उमेदवारांना संबंधित संस्था आणि उद्योगांमध्ये प्लेसमेंटची संधी उपलब्ध करून देणे.

## ५. पात्रता

1. पदविकेचे नाव –**SPARC ( Social Program on Addiction in Rural Community)**
2. कालावधी –12 महीने पूर्णवेळ
3. प्रवेश पात्रता :

   - MSW / MA (Sociology),
   - किंवा इतर शाखेतील पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण झालेले, व 2 वर्षे किंवा अधिक पूर्ण वेळ सामाजिक कामाचा अनुभव,
   - किंवा BSW + 2 वर्ष कामाचा अनुभव.

   **आवश्यक**

   – ग्रामीण समाजातील व्यसन कमी करण्याची प्रेरणा व त्यासाठी प्रत्यक्ष समाजात काम करण्याची तयारी.

   - HSSC मध्ये अथवा पदवीमध्ये किमान 45% गुण
4. प्रवेश क्षमता : 25 - प्रथम वर्षांच्या अनुभवानंतर ही संख्या बदलविता येईल. हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठातून आवश्यक शिक्षणप्राप्त विद्यार्थ्यांसाठी खुला राहील. या विषयावर काम सुरू करू इच्छिणाऱ्या स्वयंसेवी संस्था, CSR, स्त्रियांसाठी काम करणाऱ्या बचतगट संघटना, व्यसन-मुक्ती केंद्र इत्यादीसाठी विद्यार्थी स्पॉन्सर करण्यासाठी सोय राहील.
5. शिष्यवृत्ती – Rs.10000/- दरमहा ब्रिज कोर्स पूर्ण झाल्यावर आणि प्रत्यक्ष सर्च सोबत पूर्ण वेळ काम सुरू केल्यावर लागू होईल.
6. अभ्यासक्रम – पूर्णवेळ काम करता करता शिक्षण (80 टक्के वेळ प्रत्यक्ष कामातून शिक्षण व 20 टक्के वेळ ज्ञान, कौशल्य शिक्षण)
7. माध्यम – मराठी
8. कोर्स फी – रु.10,000/- वार्षिक
9. प्रवेश प्रक्रिया –निवडीच्या निकषानुसार व प्रत्यक्ष मुलाखत
10. रोज मार्गदर्शनाखाली समुदायात काम करण्याची संधी व जबाबदारी
11. मार्गदर्शक : सर्च व मुक्तिपथ मधील उच्च शिक्षण प्राप्त व अनुभवी असे 10 वरीष्ठ कार्यकर्ते.

**पूर्वतयारी** : समाजकार्य (MSW) व्यतिरिक्त इतर विद्याशाखांमधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थांना १ महिन्याचे पूर्व शिक्षण (Bridge Course) आवश्यक असेल. हे पूर्व शिक्षण गोंडवाना विद्यापीठ व सर्च / मुक्तिपथ मिळून आयोजित करतील.

६. **कार्यक्रमाचा अभ्यासक्रम**:

| **P. G. Diploma : SPARC – Syllabus** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **शैक्षणिक उद्दिष्ट्य** | **मुख्य कंटेंट** | **क्लास रूम प्रशिक्षण पद्धती** | **प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण** |
| १. | व्यसन म्हणजे काय व ते कसे ओळखावे | व्याख्या, ओळख व प्रकार, व्याप्ती, दुष्परिणाम, उपाय योजना, ऑडीट प्रश्न | लेक्चर, पीपीटी व चर्चा, केस स्टडी, व्हिडीओ (AV), साहित्य, Handouts, संबधित विषयाचे वाचन, पुस्तक, लेख | गाव शिबीर व क्लिनिक करिता रुग्ण रेफर करणे (50) |
| २. | समुदायातील व्यसनाचे प्रमाण कसे मोजावे | सर्वेक्षणाचे उद्दिष्ट, प्रश्नावली कशी भरावी, सर्व्हे कसा करावा, सर्वेयरचे प्रशिक्षण, सुपरव्हीजन, डाटा चे निष्कर्ष | प्रश्नावली, सर्व्हे, फिल्ड टेस्टीग, सुपरव्हीजन प्रत्यक्ष करणे, डाटा विश्लेषणाचे रिझल्ट्स बघणे, अर्थ लावणे | वार्षिक सर्व्हे मध्ये सहभाग घेणे व डाटा मीटिंग |
| ३. | व्यसनाबाबत आरोग्य शिक्षण काय व कसे द्यावे. | आरोग्य शिक्षण म्हणजे काय, कसे द्यावे, काय काळजी घ्यावी, उद्दिष्ट , संदेश कसे बनवावे, Nudge पद्धतीचा वापर, शाळा मोडूल, IEC मटेरियलचा गावात इतर गटांसाठी वापर | लेक्चर, पीपीटी व चर्चा, व्हिडीओ (AV), साहित्य, Handouts, संबधित विषयाचे वाचन, पुस्तक, लेख, अनुभव कथन, रोल प्ले, सराव सत्र | शाळांमधे आरोग्य शिक्षण (20), जनजागृती कार्यकर्मात भाग घेणे, गावात आरोग्य शिक्षण करणे (20) |
| ४. | व्यसन नियंत्रणासाठी ग्रामीण / आदिवासी लोकांचे संघटन करणे – ( ग्राम | गावात मिटिंग कशी घ्यावी, ग्रामसभा म्हणजे काय, कशी घ्यावी, महिला संघटन, मुक्तिपथ गाव संघटन, संघटना सक्रिय कशी बनवावी | लेक्चर, पीपीटी व चर्चा, व्हिडीओ (AV), साहित्य, Handouts, संबधित विषयाचे वाचन, रोल प्ले, सराव सत्र | 20 गावात संघटन मजबूत करणे, महिला संघटनांचे सहकार्य घेणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सभा, महिला व आदिवासी संघटना ) | | | |
| ५. | दारू व तंबाखू विरुद्ध अहिंसक सामाजिक कृती | समाजात बदलासाठी अहिंसक कृती म्हणजे काय ? कशी करावी? पद्धती काय आहे? गावाचा/शहराचा सहभाग? पूर्वतयारी, काळजी काय घ्यावी? फलित? | लेक्चर, पीपीटी व चर्चा, व्हिडीओ (AV), अनुभव कथन | 10 गावात दारू- तंबाखू विरूध्द अहिंसक सामजिक कृती ची आखणी व प्रत्यक्ष सहभाग |
| ६. | प्रशासनाचे सहकार्य घेणे | पोलीस, तहसीलदार, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग प्रशासन,पंचायती राज व नगर प्रशासन व्यवस्थे सोबत समन्वय, संयुक्त कार्य योजना तयार करणे, अंमलबजावणी करणे, पाठपुरावा करून घेणे, अडचणी सोडविणे, आवश्यक कायदे / नियम यांची माहिती | लेक्चर, पीपीटी व चर्चा अनुभव कथन, रोल प्ले | पोलिस, तहसीलदार, इतर विभाग सोबत काम, प्रशिक्षण व पाठपुरावा करणे, अडचणी सोडविणे |
| ७. | मीडिया व बातम्या | मिडिया प्रकार? समन्वय, बातमी तयार करणे, प्रकाशित करणे, दृश्य माध्यम, सोशल मिडिया | लेक्चर, पीपीटी व चर्चा, संबधित विषयाचे वाचन, रोल प्ले, सराव | कार्यक्रमाच्या बातम्या लिहिणे, उपयुक्त फोटो / व्हिडिओ सोशल मिडियाचा वापर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | व्यसन उपचार | व्यसन उपचार, गावपातळीवर क्लिनिक, तालुका क्लिनिक आयोजन, रुग्णांना समुपदेशन व पाठपुरावा कसा करावा | लेक्चर, पीपीटी व चर्चा, व्हिडीओ (AV), साहित्य, Handouts, संबधित विषयाचे वाचन, रोल प्ले, सराव सत्र | रुग्णांना उपचारासाठी प्रेरित करणे, तालुका क्लिनिक आयोजनात सहभाग, व्यसन उपचार शिबीर 10 गावात आयोजीत करणे,150 केस हिस्टरी व समुपदेशन करणे. 100 रुग्ण पाठपुरावा |
| ९. | आपल्या कामाचे नियोजन, व्यवस्थापन व मॉनिटरिंग | ध्येय, उदिष्ट, आठवडी, मासिक नियोजन कसे तयार करावे, Daily reporting through digital platform (APP) मासिक व वार्षिक अहवाल सादरीकरण | लेक्चर, पीपीटी व चर्चा, व्हिडीओ (AV), साहित्य, Handouts, संबधित विषयाचे वाचन, रोल प्ले, सराव सत्र | वर्षभर आठवडी नियोजन, मासिक नियोजन, डेलि नियोजन व रिपोर्ट करणे |
| १०. | व्यसन मुक्ती कार्यक्रम मूल्यांकन व परिणाम मोजमाप. | उदिष्ट बनवणे, कृतीचे व परिणामाचे मोजमाप करणे. मूल्यांकन - (संख्यात्मक - गुणात्मक) | लेक्चर, पीपीटी व चर्चा, व्हिडीओ (AV), साहित्य, Handouts, संबधित विषयाचे वाचन, रोल प्ले, सराव सत्र | दर महिन्याला MIS, Collect App मध्ये रोज केलेल्या कामाची नोंद करणे, आपल्या तालुक्यातील कार्यक्रमाचे मोजमाप व मूल्यांकन करणे, त्यावर अहवाल लिहिणे |

## ७. पदविका शिक्षणात क्षमता विकास

**SPARC** या एक वर्षाच्या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम हा पूर्णत: नयी तालिम यावर आधारित असेल. या कोर्सचा भर हा प्रत्यक्ष कामातून शिक्षण यावर असेल. यामध्ये पुढील कौशल्ये विकसित होतील.

१. व्यसन म्हणजे काय व ते कसे ओळखावे ?

२. समुदायातील व्यसनाचे प्रमाण कसे मोजावे ?

३. व्यसनाबाबत आरोग्य – शिक्षण काय व कसे द्यावे.? (शाळा/कॉलेज करीता, गावासाठी, वैयक्तिक व्यक्तींकरिता)

४. व्यसन नियंत्रणासाठी ग्रामीण/ आदिवासी लोकांचे संघटन कसे करावे ? - ग्राम सभा, महिला व आदिवासी संघटना

५. दारू व तंबाखू विरुद्ध अहिंसक सामाजिक कृती कशी आयोजित करावी?

६. प्रशासनाचे सहकार्य कसे घ्यावे? – कायदे, पोलीस, तहसीलदार, शिक्षण विभाग,आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग

७. मीडिया व बातम्या

८. व्यसन उपचार कसा करावा ? - गावपातळीवर क्लिनिक , तालुका क्लिनिक व रुग्णांना समुपदेशन व पाठपुरावा

९. आपल्या कामाचे नियोजन, व्यवस्थापन व मॉनिटरिंग कसे करावे?

१०. कार्यक्रमाचे मूल्यांकन व परिणामाचे मोजमाप कसे करावे?

## ८. मूल्यांकन

- प्रवेश घेतलेल्या काही विद्यार्थ्यांना ( सोशल वर्क पदवी नसलेले विद्यार्थी) एक महिन्याचा प्री-कोर्स (ब्रिज कोर्स) पात्र असणे आवश्यक आहे, त्यानंतरच त्यांना 12 महिन्यांसाठी SEARCH सोबत पूर्ण वेळ residency दिली जाईल.
- विद्यार्थ्यांचे दर 3 महिन्यांनी मूल्यांकन केले जाईल. अशा मूल्यमापनात अयशस्वी झाल्यास, त्या विद्यार्थ्याला कार्यक्रमातून काढून टाकले जाईल.
- हे सर्व मूल्यांकन सर्च/मुक्तिपथ द्वारे केले जातील.
- प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन खालीलप्रमाणे केले जाईल.

1) ब्रिज कोर्स
2) मासिक मूल्यांकन 50 X 12 = 600 Marks
3) अभ्यास निबंध/ टर्म पेपर = 100 Marks
4) बाह्य परीक्षक viva = 50 Marks
   ( कमीत कमी 50% पासिंग आवश्यक )

प्रवेश अर्ज Rs.100/- भरून www.unigug.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.